अबुझमाड शिक्षण मंडळ गडचिरोली, ता.जि.गडचिरोली संचलित सावित्रीबाई फुले उच्च माध्यमिक विद्यालय, वेलगूर, ता.अहेरी, जि.गडचिरोली या इंग्रजी माध्यमाच्या कायम विनाअनुदानित उच्च माध्यमिक शाळेचे स्थलांतर मौजा आलापल्ली ता.अहेरी, जि.गडचिरोली येथे स्थलांतराबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः माशास्थ ३३१५/प्र.क्र.२३७/एसएम-१
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ५ डिसेंबर, २०१७

वाचा :-

शालेय शिक्षणव क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांकः माशास्थ २०१२/ (५९/१२) माशि-२, दिनांक ३१ जुलै, २०१३.

संदर्भ :- १) विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर यांचे क्र. एचएससी/अ/१०६२६/२०१२, दिनांक ७ नोव्हेंबर, २०१२ चे पत्र

२) शासनाचे क्र. माशास्थ ३३१५/प्र.क्र.२३७/एसएम-१, दिनांक २७ नोव्हेंबर, २०१५ चे पत्र

प्रस्तावना :-

अबुझमाड शिक्षण मंडळ गडचिरोली, ता.जि.गडचिरोली संचलित सावित्रीबाई फुले उच्च माध्यमिक विद्यालय, वेलगूर, ता.अहेरी, जि.गडचिरोली या इंग्रजी माध्यमाच्या कायम विनाअनुदानित उच्च माध्यमिक शाळेचे स्थलांतर मौजा आलापल्ली ता.अहेरी, जि.गडचिरोली येथे स्थलांतर करण्याचा प्रस्ताव संदर्भाधीन क्र.(१) येथील पत्रान्वये शासनास सादर झाला होता. सदर प्रस्तावात त्रुटी असल्याने संदर्भाधीन क्र.(२) येथील दिनांक २७ नोव्हेंबर, २०१५ च्या पत्रान्वये प्रस्ताव अमान्य करण्यात आला होता. तथापि संदर्भ क्र.२ येथील पत्रात नमूद केलेल्या त्रुटींची पूर्तता संबंधित संस्थेने केल्याने सदर शाळेच्या स्थलांतर प्रस्तावाचा फेरविचार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

मौजे वेगलूर हे गाव वनाने व्याप्त, दुर्गम, डोंगराळ व नक्षलग्रस्त आदिवासी क्षेत्रात असल्याने तेथील विद्यार्थ्यांकरिता शिक्षणाची सोय नसल्याने तसेच तेथील विद्यार्थी व पालकांनी केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने सावित्रीबाई फुले उच्च माध्यमिक शाळेचे, वेलगूर, ता.अहेरी, जि.गडचिरोली येथून मौजा आलापल्ली, ता.अहेरी, जि.गडचिरोली येथे स्थलांतर करण्यास खाली नमूद अटी व शर्तीवर मान्यता देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. :-

२. सदर उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या जादाच्या सोयी अभ्यासक्रमाच्या दृष्टीने ग्रामीण क्षेत्रात जागा उपलब्ध नसल्याने व पालकांच्या मागणीनुसार सुसज्ज इमारतीत स्थलांतर प्रस्तावित आहे. सदर उच्च माध्यमिक शाळेचे वर नमूद ठिकाणी स्थलांतर करण्यास खाली नमूद अटी व शर्तीवर मान्यता देण्यात येत आहे :-

१) स्थलांतरीत शाळेची किमान पटसंख्येची अट कोणत्याही कारणास्तव शिथिल केली जाणार नाही.

२) स्थलांतरास सर्व शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी यांची सहमती असावी. तसेच सर्व पात्रताधारक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना स्थलांतरित ठिकाणी सामावून घेण्यात येईल व त्यांच्या सेवाशर्तीमध्ये बदल होणार नाही याबाबत संस्थेच्या अध्यक्ष/ सचिवांचे रू.१००/- च्या स्टॅम्पपेपरवर नोटरी केलेले शपथपत्र सादर करणे आवश्यक राहील.

३) शासनाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या आदेशानुसार शाळेसाठी पक्की इमारत व सर्व भौतिक सुविधा आणि शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. याबाबत संस्थेच्या अध्यक्ष/ सचिवांचे रू.१००/- च्या स्टॅम्पपेपरवर नोटरी केलेले शपथपत्र सादर करणे आवश्यक राहील.

४) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, दिनांक २८/०८/२०१५ नुसार विहित केलेल्या संच मान्यतेच्या सुधारित निकषानुसार व याबाबत शासनाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या आदेशांनुसार अनुज्ञेय होणाऱ्या पदांइतके शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी प्राथमिक शाळेत कार्यरत राहतील व त्यापेक्षा जास्त शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी कार्यरत राहणार नाहीत हे संस्थेस बंधनकारक राहील. तसेच अनुज्ञेय पदांपैकी रिक्त पदे अतिरिक्त कर्मचाऱ्यांमधून समायोजनाने भरण्याबाबत शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करणे आवश्यक राहील.

५) शासनाकडून शाळा, शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी, वेतन वेतनेत्तर अनुदान, विद्यार्थी इ. संदर्भात वेळोवेळी विहित करण्यात येणारे अधिनियम, नियम, आदेश इ. चे पालन संस्थेने करणे आवश्यक राहील.

६) स्थलांतरीत शाळेच्या बाबतीत शासन परवानगीच्या व मान्यतेच्या कोणत्याही अटी व शर्तींमध्ये बदल होणार नाही.

७) सदर शाळा मुळ ठिकाणी अनुदानाच्या ज्या तत्वावर आहे, त्याच तत्वावर स्थलांतरीत ठिकाणी मंजूरी देण्यात यावी.

८) सदर शाळा इंग्रजी माध्यमाची कायम विनाअनुदानित तत्वावर असल्याने शाळेतील मंजूर व कार्यरत शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे संपूर्ण आर्थिक दायित्व संस्थेवर राहील.

९) सदरहू स्थलांतरासंदर्भात शासनाकडे अथवा शिक्षण विभागाच्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडे कोणत्याही प्रकारच्या तक्रारी वा आक्षेप आल्यास किंवा स्थलांतरासंदर्भातील अटींचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास स्थलांतर रद्द करण्याचे अधिकार शासनास राहतील.

३. वरील परिच्छेद ३ मधील अट क्र.(२) व (३) ची पूर्तता झाल्यावर, विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांनी सदर शाळेच्या स्थलांतरास मान्यता देण्याबाबत आवश्यक पुढील कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीबाबत शासनास कळविण्यात यावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१२०५१७०८५३२३२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pravin Rajaram Mundhe

Digitally signed by Pravin Rajaram Mundhe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8cc298cb2ba38f035e6bd1a51789c7ed1ed4f4fce865eda3495969f77d97c89a, cn=Pravin Rajaram Mundhe
Date: 2017.12.05 17:13:08 +05'30'

(प्रविण मुंढे)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत –

१) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे

२) विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, जुन मॉरिस कॉलेज परिसर, पंडित जवाहरलाल नेहरू मार्ग, सिताबर्डी, नागपूर- ४४० ००२.

३) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, गडचिरोली

४) श्री. अ.हकीम अ.रहिम (बब्बू हकीम)
अध्यक्ष, अबुझमाड शिक्षण मंडळ, ता.जि.गडचिरोली - ४४२ ६०५.

५) निवडनस्ती (एसएम-१)